**नि.क्र.४४ वरिल आदेशाच्या अनुषंगाने आरोपीचा उलटतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री. एन.जी.खान यांचे मार्फत** :

२. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी नासीर गुलाब खान यांना मी पुर्वीपासुन ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, एच डी एफ सी बँकेत रियाज आलम शेख या नावाने माझे खाते आहे. मला आता दाखविण्यात आलेल्या वादातील धनादेशावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादातील धनादेश हरविल्याबाबत मी आज पर्यंत कुठल्याही पोलीस ठाण्यात तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, या वादातील धनादेशाबाबत स्टॉप पेमंट करण्याबाबत मी बँकेला कळविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी नासीर गुलाब खान यांचेविरूध्द आजपर्यंत कुठल्याही न्यायालयात तक्रार केलेली नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, जुलै २०२३ मध्ये मला आर्थिक अडचण होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी नासीर गुलाब खान फिर्यादी यांना मी पैशांची मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादी यांना कोणतेही देणे लागत नव्हतो हे मी खोटे सांगत आहे.

४. मी गाडयांचा व्यवसाय करण्यासाठी परवाना घेतलेला आहे. मी तो परवाना प्रकरणात दाखल केलेला नाही. मी तो परवाना न्यायालयात दाखल करायला तयार आहे.

प्रश्न – परवाना घेतांना तुम्ही जी एस टी नंबर घेतला होता का?

उत्तर – त्यावेळी जी एस टी नव्हता.

५. मी गाडयांचे व्यवसायाबाबत आयकर भरतो.

प्रश्न –तुमच्या सरतपासात नमुद केल्याप्रमाणे हा गाडीचा व्यवहार तुमच्या आयकर

विवरणात दाखविला आहे काय?

उत्तर – नाही.

६. मी गाडी खरेदी विक्रीचा व्यवसाय करतो, त्याकरिता माझेकडे ऑफीस, दुकान किंवा शोरूम नाही. मी गाडया खरेदी विक्री करण्याबाबत हिशोबाच्या नोंदी ठेवत नाही. गाडीचे व्यवहार झाल्याबाबत बँकेचा खातेउतारा नाही. माझा गाडी खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे हे दाखविण्या करीता साक्षीदार वसीम शेख हाआहे. हे म्हणणे खरे नाही की, मला वादातील धनादेशाची रक्कम देणे टाळायचे असल्यामुळे मी गाडयांचा व्यवहार असल्याचे सांगतो.

७. मी ज्या गाडीचा व्यवहार झाल्याचे सांगितले त्याचा लेखी दस्त नाही. माझेकडे त्या गाडीचे कागदपत्र नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, वाहन कायद्यानुसार फॉर्म नं.२९ व ३० वर सहया लागतात. हे म्हणणे खरे आहे की, ते ट्रान्सफर फॉर्म मी आजपर्यंत न्यायालयात सादर केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, ही गाडी आजपर्यंत फिर्यादीच्या नावावद ट्रान्सफर झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीला ती गाडी डिलीव्हर केल्याबाबतची माझेकडे पावती किंवा कागदपत्र नाही.

प्रश्न – हया गाडीचा व्यवहार आयकर विवरणपत्रात दाखविला आहे काय?

उत्तर – व्यवहार पुर्ण झालेलाच नाही, पुर्ण झाल्यावर दाखवु.

८. मी गाडीच्या व्यवहाराबाबत फिर्यादीकडुन घेतलेली ६०,०००/– रूपये आयकर विवरणात दाखविलेले नाही. गाडी फिर्यादीला डिलेव्हर केल्याचे आणि ते स्वीकारल्याबाबत कोणताही कागद माझेकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला गाडी विक्री केल्याचे आणि त्याने खरेदी केल्याचे मी खोटे सांगत

आहे.

९. हे म्हणणे खरे आहे की, मी अनीमोन एच ए एच ॲण्ड सन्स कायकुल्लम, ता. कर्तीकपाली, जि. अलापी, केरळ यांचेविरूध्द मी प्रकरण दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या प्रकरणात नमुद केल्याप्रमाणे कांदे विक्री व भुसार माल याबाबतचा माझा अहमदनगर येथे व्यवसाय होता. हे म्हणणे खरे आहे की, एससीसी क्र.५५६/२०२५ हे प्रकरण रेणुकामाता मल्टीस्टेटने माझेविरूध्द दाखल केले होते, ते प्रलंबीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, रेणुकामाता मल्टीस्टेटने माझेविरूध्द लवाद दरखास्त क्र.३५७/२०२५ दाखल केली आहे, ती प्रलंबीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मे.वैष्णवी कुरीस प्रा.लि. यांनी माझेविरूध्द लवाद दरखास्त क्र.१४१८/२०२४ दाखल केली आहे, ती प्रलंबीत आहे. सर्व प्रकरणाच्या प्रमाणीत प्रती असल्यामुळे त्यांना **नि.क्र.४६ ते ४९** देण्यात आले.

१०. हे म्हणणे खरे नाही की, माझे एच डी एफ सी बँकेतील खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसतांना मी फिर्यादीला वादातील धनादेश दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.२० वरिल नोटीस मला मिळाली. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.२१ वरिल पोहोच पावतीवर माझी सही आहे. वादातील चेक वटला नाही म्हणुन मी फिर्यादीला चेक परत मागितला होता. माझेकडे त्याबाबतचा लेखी पुरावा नाही. माझेकडे माझे तोंडी शब्दाशिवाय इतर कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वादातील नोटीसला अद्यापपर्यंत उत्तर दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी परतफेडीकरता वादातील धनादेश फिर्यादीला दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीला कोणतीही कार

विकली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी कायदेशीर देय रक्कम देण्याकरिता फिर्यादीला वादातील चेक दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी कायदेशीर जबाबदारी टाळण्याकरिता खोटा बचाव दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथेवर खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**साक्षीदाराचा जबाब नोंदवितांना डायसलगतचे स्क्रीन व भिंतीवरील स्क्रीन चालु केले होते व त्यांचे समक्ष संगणकावर साक्ष नोंदवण्यात आली.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत
जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.
सही/-
(माधुरी रा.खनवे)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं.०४, अहमदनगर

दिनांक १८/०२/२०२६